ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# मराठयांच्या उत्तर मोहीमा व मल्हारराव होळकर (इ. स. १७२० - इ. स. १७५०)

**श्री. अंबादास औं. बाकरे**
*सहाय्यक प्राध्यापक (इतिहास)*
*न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया*
***Email: ambadas_bakre@rediffmail.com***

***सारांश***

*मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतरण करण्याचे धोरण छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वात आखले गेले. या धोरणाची अंमलबजावणी क्रमशः बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पहिल्याच्या काळात प्रभावीपणे झाली. विशेषतः बाजीराव पहिल्याच्या अग्रवर्ती धोरणाने मोगलांच्या दुर्बल शक्तीचा समाचार घेत स्वराज्याचे क्षेत्र उत्तर भारतात विस्तारित करण्यावर भर दिला. बाजीराव प्रथमच्या दृष्टीकोनाला त्यावेळच्या उमदया मराठा सरदारांनी प्रतिसाद देत गुजरात, माळवा, खान्देश व त्यानंतर राजपूताना, बुंदेलखंड ते बंगालपर्यंत मजल मारली. होळकर, पवार, गायकवाड, शिंदे, कदमबांडे इत्यादी मराठा सरदारांनी मोगल प्रदेशाला लक्ष्य करून तेथे मराठा सत्तेचा ध्वज उभा केला. मोगलांना मराठयांच्या आश्रयाला येण्यास भाग पाडले.*

*इ.स. १७२०-१८०२ अशी जवळजवळ ८० वर्षे मोगल बादशहा प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात मराठा संरक्षणात राहीला. या कालावधीत मराठा सरदारांनी केवळ स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले नाही तर आंतरिक व बाहय संकटापासून दिल्लीच्या गादीचे संरक्षणही केले. या विस्तार व संरक्षणाच्या धोरणात क्रमशः होळकर व शिंदे सरदारांचे योगदान महत्वाचे राहीले.*

*शब्दसंक्षेप – बाजीराव पहिला, मल्हारराव होळकर, मराठा सत्तेचा विस्तार, मोगल सत्ता, संघर्ष, तह, वारसा युद्ध*

प्रस्तावना

इ.स. १७२०-१७४० या वीस वर्षांत मराठयांचे उत्तर धोरण शह काटशहाचे राहीले. मोगल बादशहाने मोगल सरदार व राजपूत मनसबदार (औरंगजेबाच्या मृत्युनंतर बहुतेक राजपूत मनसबदार आपापल्या प्रदेशांचे स्वायत्त शासक बनले होते.) यांच्या मदतीने माळवा, गुजरात व बुंदेलखंडातून मराठयांना हुसकावून लावण्याचा सर्व प्रकारे प्रयत्न केला. मात्र मोगलांना यात यश आले नाही. उलट मराठयांचे वाढते सामर्थ्य, मोगल दरबारातील दुफळी व राजपूत शासकांमधील वैमनस्य या बाबी मराठयांच्या उत्तरेतील दृढीकरणाला पुरक ठरल्या.[१] शिवाय छत्रपती शाहूंच्या 'पातशाही जिवंत ठेवण्याच्या' नितीने ही मराठयांना उत्तरेत स्थिरावण्यात मोलाची भुमिका बजावली. छत्रपती शाहू महाराज व बाजीराव प्रथमच्या धोरणांची सांगड घालीत मराठा सरदारांनी उत्तर भारत कवेत घेण्यास प्रारंभ केला. उदाजी पवार व बाजीराव प्रथम यांच्यातील माळवा वाटणीवरून झालेल्या मतभेदाचा फायदा मल्हारराव होळकरांची माळव्यातील सर्वोच्च अधिकारी तसेच सोबतीला राणोजी शिंदे यांची नेमणूक करून दोघांनाही माळव्यातील सुभेदार व जमीनदारांसोबत वाटाघाटी करण्याचा अधिकार बाजीराव प्रथमने छत्रपती शाहू महाराजांच्या वतीने दिला.[२]

**१७२०-१७४० कालखंडातील मल्हारराव होळकरांच्या मोहीमा**

या कालखंडात मल्हारराव होळकरांनी पेशव्यांचा प्रतिनिधी या नात्याने उत्तरेतील मोहीमांची जबाबदारी सांभाळली. मराठा सत्तेच्या विस्ताराचा हा कालखंड होता. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, बाजी भिवराव कदमबांडे, उदाजी पवार इ. मातब्बर मराठा सरदारांनी या कालखंडात मराठा सत्तेचा विस्तार नर्मदेपर्यंत केला.[3] विशेषतः मल्हाररावांनी मराठयांना उत्तरेत स्थिरावरण्यात प्रोत्साहित केले. राजपूतांसह, मोगल सरदारांना मराठयांना खंडणी देण्यास भाग पाडले.४ उत्तरेतील सत्तांना मराठा सामर्थ्याचे दर्शन मल्हारराव होळकरांनी या काळात घडविले.[५]

**१७४०-१७६१ कालखंडातील मल्हारराव होळकरांच्या मोहीमा**

मराठा सत्तेचे उत्तरेत साम्राज्यात रूपांतरण होण्याचा हा कालखंड होता. बाजीराव प्रथमच्या तालमीत तयार झालेले व उत्तर भारताला जवळून ओळखणारे होळकर, शिंदे, पवार कदमबांडे या मराठा सरदारांनी दुर्बल मोगल व स्वप्रदेशात मग्न राजपूतांना मराठयांच्या संरक्षणाखाली आणले. या काळात मराठयांनी अटकेपार स्वराज्याचा ध्वज नेला. पेशवे-दाभाडे संघर्षाने मराठयांच्या मध्य भारतातील

मोहीमांना काही काळ अडथळा निर्माण झाला. याचा फायदा उचलत उत्तरेत बादशहाने माळव्यावर महंमद बंगश व गुजरातवर अभयसिंग अशी नेमणूक करून मराठयांना माळव्यातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला[६] तर दक्षिणेतून निजामानेही महंमद बंगशाशी संधान साधून मराठा विरोधी पवित्रा घेतला. या पार्श्वभुमीवर मल्हारराव होळकरांनी वरील संघर्षाचा फायदा बंगश निजाम यांना होणार नाही याची दक्षता घेत बंगशाला माळव्यापुरतेच मर्यादित ठेवले.[७] मल्हाररावांच्या कुटनितीमुळे दाभाडे-बंगश-निजाम गठबंधन होऊ शकले नाही व बाजीरावास दाभाडेचा बिमोड करणे शक्य झाले. शिवाय मल्हारराव होळकरांनी बंगशालाही माळव्यात स्थिरावू दिले नाही.[८]

मल्हारराव होळकरांचे योगदान

बाळाजी विश्वनाथच्या कारकीर्दीपासूनच मराठयांच्या उत्तर धोरणाला प्रारंभ झाला होता. दक्षिणेच्या सनदा स्वराज्यात आणतांना बाळाजी विश्वनाथांनी बाजीरावास उत्तरेत ठेवून याची अप्रत्यक्षपणे मुहूर्तवेढ केली.. तर होळकर, पवार यांनी माळवा काबीज करण्याच्या दृष्टीने कुटनितीक प्रयत्न प्रारंभ केले.[९]

**माळव्यावर नियंत्रण**

इ.स. १७२० नंतर मराठयांनी स्विकारलेल्या अग्रवर्ती धोरणाचा परिणाम म्हणजे मराठयांचे माळव्यावर नियंत्रण मोगल आमदनीत माळवा मोगल साम्राज्याचा मध्यवर्ती भाग होता. या प्रदेशातून उत्तर-दक्षिण असा समतोल साधला जात होता. हा समतोल दिल्लीतील गोधळांचे राजकारण व माळव्यातील बिघडलेली स्थिती यामुळे मराठयांच्या हातात येण्यास फार वेळ लागला नाही.[१०] माळवा घेण्याच्या हेतूने मल्हारराव होळकरांनी इंदोरचा जागीरदार नंदलाल मंडलोई व बढवाणीचा ठाकूर यांना कुटनितीने आपल्या बाजूने वळवून माठव्यातील मराठयांचा प्रवेश सुनिश्चित केला व बाजीरावाच्या आगमनानंतर माळव्याचा सुभेदार गिरीधर बहादूर व दया बहादूर यांच्याशी सारंगपूर येथे युद्ध (मार्च १७२३) केले. ज्यांत बहादूर बंधूचा पराभव झाला. माळवा मराठयांच्या ताब्यात आला.[११] महंमद बंगशच्या जागी नेमणूक झालेल्या सवाई जयसिंगाला ही मराठयांनी माळव्यात स्थिरावू दिले नाही. सवाई जयसिंगाच्या मराठा विरोधी कारवायांवर मोहीत आखत मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांनी जयसिंगाला मंदसोरचा तह (५ मार्च १७३३) करण्यास भाग पाडले. या तहाने मराठयांचे माळव्यांवर पुर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले.[१२] बाजीरावाने माळव्याची होळकर, शिंदे, पवार यांच्यात वाटणी करून दिली.

**राजपूतानातील मराठा प्रवेश**

माळव्यावरील नियंत्रणानंतर मराठयांनी राजपूताना प्रदेशाकडे आपले लक्ष केंद्रित केले. यामागे अर्थात पुढील बाबी कारणीभूत होत्या

1. मराठयांविरोधात राजपूत शासकांनी घेतलेली भुमिका. (अभयसिंग व जयसिंग)
2. राजपूतांची माळवा –गुजरातवरल वक्र दृष्टी
3. राजपूतानातील आंतरिक प्रश्नांच्या सोडवणूकी संदर्भात मराठयांकडे मागीतलेली मदत - बुंदी कोटा

मराठयांचा राजपूताना प्रवेश ही मराठयांसाठी चालून आलेली संधी होती. या संधीचा सर्वप्रथम लाभ मल्हारराव होळकरांनी घेत बुंदी वारसा प्रकरणांत प्रत्यक्ष हस्तक्षेप करून मराठयांच्या राजपूताना प्रवेशाला प्रारंभ केला.[१३]

**कोटा तह**

बहादूर बंद व सवाई जयसिंगाच्या पराभवानंतर पुन्हा इ.स. १७३४ मध्ये दिल्ली दरबारातून माळवा काबीज करण्याच्या हेतूने वजीर कमरूद्दीन खान, मीरबक्षी खानदौरान व महंमद बंगशची रवानगी करण्यात आली.[१४] यावेळी सवाई जयसिंग (जयपूर), व अभयसिंग (जोधपूर) व दुर्जनसिंग (कोटा) हे राजपूत शासकही मोगलांना येऊन मिळाले.[१५] मात्र मोगलाच्या या युतीलाही मराठयांवर विजय मिळविता आला नाही. या मोहीमेवेळी मल्हाररावांनी राजपूताना प्रदेशांत निवडक सैन्यासह जयपूर, जोधपूर, बुंदी-कोटा प्रदेशातून विपूल लुट मिळविली.[१६] तर मोगलांना मराठयांशी कोटा तह (२२ मार्च १७३५) करून माळव्यातील मराठयांच्या हक्कांना मान्यता दयावी लागली.

या मोहीमेचे नेतृत्व अर्थातच मल्हारराव होळकरांनी केले. त्यांच्या चाणाक्षतेने राजपूतांना मोगल सैन्यापासून दूर जाण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे तर यानंतर राजपूत शासकांनी संयुक्तपणे मोगलांच्या कोणत्याही मोहीमेत प्रत्यक्ष भाग घेतला नाही. राजपूत शासकांनी आपला प्रदेश संरक्षित करण्यावर भर दिला. कोटा तहाने प्राप्त माळव्याचे अधिकार देण्यास बादशहाने नकार दिल्याने बाजीरावाने उत्तर मोहीम प्रत्यक्ष हातात घेतली. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, पवार, कदमबांडे, बाजी भिवराव, इ. मातब्बर सरदार सोबत घेऊन बाजीरावाने उत्तरेची वाट धरली. याच

काळात पेशव्याने मेवाड, जयपूर शासकांची भेट घेतली.[१७] व राजपूतानाकडून खंडणी घेतली. या मोहीमेचे नेतृत्व स्वतः बाजीरावाने केले.

इ.स. १७३७ मध्ये मोगल बादशहाच्या वतीने निजामाने मराठयांवर माळव्यात मोहीम काढली त्यावेळी निजामाला उत्तरेतून मदत न मिळू देण्याची जबाबदारी बाजीरावाने मल्हारराव होळकरांवर सोपविली. मल्हाररावांनी सफदरजंग व दुर्जनसाल यांचा पराभव करून ही जबाबदारी योग्य रितीने पार पाडली.[१८] ज्यामुळे निजामाला बाजीरावासोबत दुराई–सराईचा तह करण्याशिवाय पर्याय उरला नाही.[१९] मल्हारराव होळकरांच्या तत्परतेने निजामाला उत्तरेतून कोणतेही सहकार्य मिळाले नाही. ज्यामुळे या मोहीमेनंतर निजाम पुन्हा उत्तरेत उतरला नाही.[२०] मात्र माळवा मराठयांना सहजपणे मिळू न देण्याकरीता निजामाने चुलतबंधु अजीमुल्लाखानाची माळव्यावर नेमणुक केली. परंतु मल्हारराव होळकरांच्या भितीने त्याने माळव्यात पाउल ठेवले नाही.

याच कालखंडात माळव्यात मराठा सरदारांतील आंतरिक संघर्षाचे पडसाद पडण्याची चिन्हे दिसू लागली. पेशवा-दाभाडे संघर्षात पवारांनी दाभाडेचा पक्ष घेतल्याने माळव्यातील मराठयांच्या हितसंबंधाना स्वकीयांकडूनच धोका उत्पन्न होउ लागला हे लक्षात घेउन मल्हाररावांनी दाभाडे गटापासून माळवा सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने पवारांच्या ताब्यांतील धार किल्ला व लगतचा प्रदेश जिंकून घेतला शिवाय दाभाडे गटातून पवारांना फोडून पेशव्यांच्या सेवेत आणले.[२१] मल्हाररावांच्या या मोहीमेने पेशवा विरोधी गटाचे उत्तरेतील महत्व जवळ जवळ संपुष्टात आले. शिवाय माळवा प्रांतावर मराठा साम्राज्याची पकड अधिक मजबूत बनली.

मल्हारराव होळकरांच्या हयातीत शिंदे-होळकरांचे संबंध बुंदी प्रकरणातून बिघडले ते मल्हारावांच्या मृत्युपर्यंत कायम राहीले. या प्रकरणाने मराठयांच्या उत्तर धोरणावर प्रत्यक्ष जरी प्रभाव पडला नसला तरी, अप्रत्यक्ष सत्ता विस्तार धोरणाला यामुळे मर्यादा आल्या. अर्थात मराठा साम्राज्याच्या हिताला दोन्ही सरदारांनी कायम जपले. व आपले आंतरिक विवाद कधीही चव्हाटयावर येउ दिले नाही. या विवादात हस्तक्षेप करण्याची नामुष्की पेशव्यावर आली नाही.

**राजपूत वारसा प्रकरण व शिंदे - होळकर विवाद**

मराठयांनी राजपूत वारसा प्रश्नांत स्वतःहून कधीही हस्तक्षेप केला नाही. मोगल सत्तेच्या कमकुवत पणाने हा प्रश्न राजपूत शासकांनी स्वतः मराठयांच्या पुढे ठेवला व हस्तक्षेप करण्याची विनंती केली. बुंदी प्रकरणात जयपूर शासक सवाई जयसिंगाने हस्तक्षेप करून बुधसिंगास बाजूला सारून दलेलसिंगास गादीवर बसविल्याने बुधसिंगाच्या पत्नीने प्रतापसिंग हाडाला मराठयांकडे मदतीसाठी पाठविले. छत्रपती शाहूच्या आज्ञेने मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घालून बुधसिंगास गादी मिळवून दिली व त्याबदल्यात ६ लाख रूपये घेउन मराठयांनी बुंदीतून काढता पाय घेतला.[२२]

अर्थात मराठयांच्या हस्तक्षेपाने राजपूत शासकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. मराठयांच्या संघटित प्रतिकार करण्याच्या हेतूने सवाई जयसिंगाच्या नेतृत्वात राजपूतांचे "हुरडा संमेलन" भरले. मात्र त्यातुन काहीच निष्पन झाले नाही.[२३] मात्र बुधसिंगाचा हक्क फार काळ टिकला नाही. मल्हाररावांची माठ फिरताच सवाई जयसिंगाने पुन्हा दलेलसिंगाला बुंदीच्या गादीवर बसविले. हे प्रकरण बाजीराव सवाई यांच्यातील करारामुळे सवाई जयसिंगाच्या मृत्युपर्यंत मल्हारावांना हाताळता आले नाही. सप्टेंबर १७४३ मध्ये सवाई जयसिंगाचा मृत्यु झाला व बुंदीसह जयपूर वारसा प्रकरणाने उचल खाल्ली. यावेळी कोटा शासक दुर्जनसालाच्या विनंतीवरून मल्हाररावांनी पुनः बुधसिंगाचा मुलगा उमेदसिंगास बुंदीची गादी मिळवून दिली.[२४] यावेळीही जयपूर शासक ईश्वरसिंग यांने शिंदेची मदत घेउन बुंदीच्या गादीवर पुन्हा दलेलसिंगास विराजमान केले.[२५] "सवाई जयसिंगाच्या मृत्युने राजपूतानातील सत्ता संतुलनाचे मराठयांना राजपूतांच्या आंतरिक प्रश्नापासून दुर ठेवण्याचे तत्व संपुष्टात आले. इ.स. १७४३ नंतर राजपूत वारसा प्रश्न सातत्याने स्वतःहून मदतीसाठी मराठयांकडे आले व पेशव्या आज्ञेने मराठा सरदारांनी (शिंदे-होळकर) या प्रश्नात हस्तक्षेप केला.[२६]

विशेषतः इ.स. १७५० नंतर राजपूताना मराठा सरदारांच्या खंडणीचे क्षेत्र बनला. यांत पेशव्यांनी ही वाटा उचलला. ज्यामुळे वरकरणी राजपूत शासक मराठयांना दबकून दिसत असले तरी त्यांची मराठा विरोधी निती सातत्याने कायम राहीली. ज्यात मुख्यत्वे जयपूर, जोधपूर शासकांची भुमिका महत्वाची होती"

जैतपूर विजय मल्हारराव होळकरांच्या सामरिक चातुर्याचे उदाहरण होते. बुंदी प्रकरणातून होळकर-शिंदे अढी निर्माण झाल्याने बुंदेल शासकांविरोधातील मोहीमेचे आदेश

पेशव्यांनी दिल्यानंतर मल्हारराव होळकरांनी त्याला प्रतिसाद दिला नाही.[२७] ज्यामुळे जयप्पा शिंदे व रामचंद्रबाबा जैतपूरवर चालून गेले. मात्र या बळकट किल्ल्यासमोर त्यांचा टिकाव लागणे मुश्कील होते. शेवटी जयप्पा शिंदेनी मल्हाररावांना पत्र लिहून ताबडतोब येण्याची विनंती केली. शेवटी सरकारातील कार्य समजून मल्हारावांनी या मोहीमेत भाग घेतला. व जैतपूरचा किल्ला मराठयांच्या ताब्यात आणला. जैतपूर शासक जगतराज बुंदेले पळून गेला.[२८]

"जैतपूरच्या विजयाने मराठयांचा उत्तर भारतातील दरारा आणखीनच वाढला. अर्थात जैतपूरचा किल्ला पेशव्याच्या आज्ञेने पुन्हा जगतराजला परत करण्यात आला. मात्र त्याकडून खंडणी व काही प्रदेश मराठा सरदारांनी घेऊन जगतराजवर मराठा प्रभाव प्रस्थापित केला"

इ.स. १७४३–१७५० या कालावधीत मराठा सरदार मुख्यत्वे राजपूत प्रश्नांत अडकून पडले. (शेजवळकर टिप) ज्यामुळे मराठा सरदारांमध्ये होळकर-शिंदे राजपूत प्रश्नावरून जी दुही निर्माण झाली. ती शेवटपर्यंत कायम राहीली. याचा मराठयांच्या उत्तर धोरणांवर गंभीर प्रभाव जरी पडला नसला तरी मराठा सरदारांमध्ये बाजीराव पहील्याच्या कारकिर्दीत असलेला दृष्टीकोन हळूहळू कमी होत गेला.

**दिल्लीतील राजकारण व मराठयांचा हस्तक्षेप**

दिल्लीतील राजकीय हस्तांतराने मोगल दरबारात निर्माण झालेल्या गटबाजीने वजीर सफदरजंग यांच्या राजकीय स्थानाला धक्के देण्याचे प्रयत्न दुराणी व तुराणी गटाने प्रारंभ केला. यावेळी तुराणी पठाणांचे नेतृत्व महमंदशहा बंगश करत होता त्याचे रोहीलखंडात प्राबल्य होते. महमंद बंगश आणि वजीर सफदरजंगातील संघर्षात वजीराचा पक्ष कमजोर पडल्याने वजीर सफदरजंगाने मराठयांकडे मदत मागितली. [२९] मराठयांच्या वतीने मल्हारराव होळकर व जयप्पा शिंदे यांनी आग्रा येथील कृष्णदास तलावावर वजीराची भेट घेउन त्यांसम दत करण्याचे मान्य केले. मल्हारराव होळकर, जयप्पा शिंदे दत्ताजी शिंदे, खंडेराव होळकर, साबाजी शिंदे, असा संपुर्ण होळकर-शिंदे परिवार या मोहीमेत उतरला. मराठयांनी महमंद बंगशाची फत्तेगढावर कोंडी करून त्याला किल्ल्यावरून पळून जाण्यास बाध्य केले. सफदरजंगाची समस्या सुटली असली तरी संकट टळले नव्हते. म्हणून वजीराने मल्हारराव व जयप्पाची मनधरणी करून त्यांना दोआबात छावणी करण्यासाठी तयार केले. [३०]

**मराठे पादशाही संरक्षक बनले**

छत्रपती शाहूचे स्वराज्य विस्तारासंदर्भात मोगल सत्तेबाबत "पादशाही टिकावी" हे धोरण राहीले. त्यामुळे मराठयांनी उत्तरेतील माळवा, बुंदेलखंड पर्यंतचा प्रदेश जिंकूनही त्यावर प्रत्यक्ष ताबा मिळविला नाही. या प्रदेशातून चौथ, सरदेशमुखी व युध्द खंडणी वसूल करण्यावर भर दिला. मराठयांना मोगलांकडून दक्षिण व माळव्याच्या ज्या सनदा मिळाल्या त्यानुसार इ.स. १७५० पर्यंत मराठा सरदार मोगल प्रांतात वावरले. मात्र वजीर व बंगश संघर्षाने मराठयांसमोर नविनच स्थिती निर्माण करून ठेवली.[३१] (नादिरशहाच्या आक्रमणावेळीही मराठयांचे मुख्य सूत्र दिल्लीची पातशाही रक्षणाचेच होते. इ.स. १७५१ मध्येही अहमदशहा अब्दालीच्या आक्रमणावेळीही मराठयांनी वरील सुत्राची पुनरोक्ती केली. परंतु यावेळी जबाबदारी वाढली. मराठा सरदार पातशाहीचे संरक्षक बनले.)

मराठयांचे दोआबातील अस्तित्व अर्थातच पठाणांना मानवणारे नव्हते. बंगश व मल्हारराव होळकर यांच्यात यावेळी सख्य निर्माण झाल्याने रोहीलखंडात बंडाण पुर्णपणे बिमोड झाला नाही. उलट पठाणांचा नवा नेता नजीबखानाच्या महत्वाकांक्षेने अब्दालीला दिल्लीत पाचारण करून अल्पावधीतच मराठयांना शह देण्याचा प्रयत्न केला.[३२] यामुळे मराठयांचा दोआबमधून पाय निघत नव्हता. कारण अब्दालीचे संकट दिल्लीवर घोंघावू लागले होते व त्याचा सामना करण्याचे धाडस बादशहा वजीर दोघांमध्येही नव्हते. मराठयांच्या पठाणांवरील स्वा-यांमध्ये एका मोहीमेत खडेराव होळकर अहमदखान बंगशच्या तावडीत सापडला मात्र बंगशने खंडेरावास चांगली वागणूक देउन त्यांस माघारी जाउ दिले. शिवाय दोआब मोहीमेत मराठयांची पैशाची निकड अंतस्थपणे अहमदशहाने पुर्ण केली. त्यामुळे बंगशचा पुर्ण पाडाव मराठयांनी केला नाही.[३३]

दोआबात मराठयांची स्थिती विचीत्र बनली होती. अनोळखी प्रदेशात सलग वर्षभर चाललेले युध्द, त्यात पैशाची निकड, न मानवणारे हवामान व भरीसभर अब्दालीच्या आकमाणाची बातमी. यामुळे दोआबातून काडता पाय घेण्याशिवाय मराठा सरदारांकडे दुसरा पर्याय नव्हता. शेवटी बादशहा व मराठयांच्या दबावामुळे वजीर सफदरजंगाला अहमदशहासोबत तह करणे भाग पडले. या तहाने मिळालेल्या प्रदेशापैकी अर्धा प्रदेश मराठयांना मिळाला. त्याची व्यवस्था पेशव्याने शिंदेकडे दिली. [३४]

या युध्दात मल्हारराव होळकरांनी वजीर व पठाण दोन्ही पक्षांवर आपला प्रभाव पाडला. अब्दालीच्या आक्रमणाच्या

पार्श्वभुमीवर मराठयांना हवी असणारी उसंत या तहाने मिळाली. सादुल्लाखान व अहमदशहा बंगश यांनी शिंदे-होळकरांमुळे आपला जीव वाचला म्हणून त्यांना ५० लाख रूपये दिले. मल्हारराव होळकर व शिंदे यांच्या ह्या कृतीचे विश्लेषण करतांना यादव गुजर म्हणतात की, मराठयांनी पैशाच्या लोभाने पठाणाचा बचाव केला. तो पुढे त्यांना पानिपतावर भोवला. मल्हारराव होळकरांची ही अक्ष्यम चुक होती.... त्यांनी पठाणांचा कायमचा काटा काढायला पाहीजे होता. उलटपक्षी नजीबखानाशी सख्य जोडून त्यांना मराठयांच्या शिरावर एक तलवार मात्र टांगून ठेवली.[३५]

मराठयांनी वजीराला केलेली मदत आर्थिक हेतूने असली तरी त्यामागे छत्रपती शाहूचे "पातशाही रक्षावी" धोरण होते. नवोदित पातशहा मराठयांना अनुकूल व्हावा ही विचार दृष्टीही होती. त्या पार्श्वभुमीवर या मदतीचा हेतू नितांत राजकीय होता. मात्र मोहीमेदरम्यान मराठयांना लागणारा खर्च देण्यास सफदरजंग कमी पडला व मराठयांचे आर्थिक व सामरिक नुकसान होऊ लागले. [३६] त्यावेळी मराठयांनी येथे माघार घेणे उचित समजले.

मल्हारराव होळकरांना दोआब मोहीमेचे फलित म्हणून मोगल बादशहाने चांदवडची देशमुखी दिली.

**इ.स. १७५० नंतरचे राजकारण**

इ.स. १७५० नंतर मराठयांच्या उत्तर मोहीमांचे समीकरण बदलले. विशेषतः शिंदे-होळकरांच्या उत्तरेतील स्वतंत्र महत्वाकांक्षा, नानासाहेब पेशच्याचा उत्तर दृष्टीकोन, पादशाही सत्तेतील स्थित्यंतरे व राजपूतानातील वारसा संघर्ष या सारख्या परस्पर विरोधी धोरणांमुळे मराठयांच्या उत्तर मोहीमांना मर्यादा येउ लागल्या.[३७] भौगोलिक नियंत्रणापेक्षा आर्थिक वसूलीवर मराठयांनी नंतरच्या काळात अधिक भर दिला. ज्यामुळे शिंदे-होळकर, होळकर-हिंगणे, होळकर-अंताजी असे काही विवाद मराठा सरदारांत निर्माण झाले. छत्रपती शाहूच्या मृत्युनंतर मराठा साम्राज्याची सुत्रे पुर्णतः पेशव्याच्या हाती गेली. यामुळे सत्ता संतुलनाचे मराठा सत्तेचे मुळ धोरण मागे पडून मराठा साम्राज्याची प्रतिमा उत्तर भारतात आर्थिक लुटारू या रूपाने अधिकच जाणवू लागली.[३८] राजपूत वारसा प्रश्नात ही बाब प्रकर्षाने दिसून येते. छत्रपती शाहू-बाजीराव प्रथम प्रणित मोगल साम्राज्याला लक्ष्य करण्याचे व त्यावर नियंत्रण मिळविण्याचे धोरण पुढील काळात मागे पडले. त्याजागी पेशव्यांनी कन्नौज तहान्वये अप्रत्यक्षतः पातशाही चाकरी स्विकारून मराठयांचे उत्तर धोरण बदलून टाकले, ज्याचा परिणाम मराठयांना पानिपतावर भोगावा लागला. [३९]

पानिपत युद्धानंतर मराठा प्रभाव निर्माण करण्याचे मोठे कार्य मराठा सरदारांना पार पाडावे लागले. दुर्दैवाने इ.स. १७६५ मध्ये मल्हाररावांचा मृत्यु झाला व ही जबाबदारी महादजी शिदेवर आली. त्यांत भरीसभर यावेळी पेशवे दराबारांत निर्माण झालेला वाद यामुळेही मराठा सामर्थ्य वाढवण्यापेक्षा विखरत गेले. ज्याचा मराठयांच्या उत्तर धोरणावर गंभीर प्रभाव पडला. इ.स. १७२० पासून इ.स. १७५० पर्यंत मराठा सरदारांनी उत्तरेत जे कमावले होते ते टिकवून ठेवण्यासाठी महादजी शिंदेना (एकटयांना) प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली.

**समारोप**

मराठयांच्या साम्राज्यविस्तार धोरणाच्या प्रारंभीच्या धाकधुकीच्या कालखंडांचे धुरिणत्व स्विकारणा-या सरदारांमध्ये मल्हारराव होळकरांचे स्थान महत्वपुर्ण राहिले आहे. मल्हारराव होळकरांनी छत्रपती शाहू महाराजांच्या दिल्लीविषयक दृष्टिकोनाला मुर्त रूप देण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यांनी राबविलेल्या मोहिमांमुळे मराठा सत्ता उत्तरेत स्थिरावण्यात यशस्वी ठरली. बाजीराव प्रथमच्या खांदयाला खांदा लावून त्यांनी माळवा, गुजरात व राजपुताना प्रदेश मराठा प्रभुत्वाखाली आणले. मल्हारराव होळकरांच्या उत्तरेतील उपस्थितीमुळे बाजीरावाला दक्षिणेत निजामाला शह देणे सहज साध्य झाले. मल्हारराव होळकरांनी मोगल सत्तेच्या मर्मस्थळावर – माळवा – पाय रोवत मोगल सत्तेला मराठा प्रभुत्वाखाली आणण्यात ही महत्वपुर्ण भुमिका बजावली

**संदर्भ**

१. *सरकार जदुनाथ, मुगल सत्ता का पतन भाग १, शिवलाल अग्रवाल एण्ड कं (प्रा.)लिमिटेड, दिल्ली पृ. १३६*
२. *सरदेसाई गो. स. पेशवे दफ्तर, भाग ३०, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, पृ. ३००*
३. *गुजर यादव, मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ, डॉ. यादव गुजर, नागपूर, १९९१, पृ. ३०*
४. *सरदेसाई गो.स., मराठी रियासत बाजीराव पेशवे, गणेश विठ्ठल कुलकणी, मुंबई, १९२०, पृ. १९२*
५. *गुजर यादव, पृ. ३२*
६. *उपरोक्त, पृ. १६*

७. ***Sinh, Raghubir, Malwa in Transition - The First Phase** (1698-1765), **D B Taraporvala Son's and Co., Bombay,** 1936. पृ. ४५*
८. *बेहरे, ना.के., पहीले बाजीराव पेशवे, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई १९३०, पृ. १६०, केळकर य.नं. होळकरांची कैफियत, हनुमान प्रकाशन, पुणे,१९५४, पृ. ०८*
९. *सरदेसाई गो. स.,काळे या.मा. व वाकस्कर वि.स.(संपा.) - ऐतिहासिक पत्रे यादी वैगेरे, श. न. जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९३० पृ. ७१*
१०. *उपरोक्त, पृ. ९३*
११. *बेहरे, ना.के, पृ. १६२*
१२. *सरदेसाई गो. स. पेशवे दफ्तर भाग १४, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, पृ. ११, देवल, चन्द्रप्रकाश, वंशभास्कर, साहित्य अकादमी, दिल्ली पृ. ३२१७*
१३. *सरकार जदुनाथ, पृ. १३६, **Dighe V .G., Peshwa Bajirao I and Maratha Expansion, Karnataka Publishing House, Bombay** 1944 पृ. ११८*
१४. *सरदेसाई गो. स. पेशवे दफ्तर भाग १४, पृ. ३३*
१५. *सरदेसाई गो.स., मराठी रियासत बाजीराव पेशवे, पृ. २७१*
१६. *बेहरे, ना.के., पहीले बाजीराव पेशवे, पृ. २३६*
१७. *उपरोक्त, पृ. २३९*
१८. ***Dighe V.G., Peshwa Bajirao I and Maratha Expansion,** पृ. १४८*
१९. *गुजर यादव, पृ. ८६*
२०. *पेशवे दफ्तर भाग १४, पृ. ११*
२१. *पेशवे दफ्तर भाग १४, पृ. १८, पेशवे दफ्तर भाग १५, पृ. ०१ (वारसा प्रकरणांत मल्हाररावांनी मदत केल्यामुळे गादी प्राप्त झाल्याने बुधसिंगाच्या पत्नीने मल्हारावांच्या हातात राखी बांधून त्यांना आपला भाऊ मानले - वंशभास्कर पृ. ३२१७)*
२२. *देवल, चन्द्रप्रकाश, पृ. ३२१७*
२३. *उपरोक्त, पृ. ३२२७*
२४. *पेशवे दफ्तर भाग २१, पृ. १०*
२५. *ठाकूर वा. वा. (संपा.) - होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदूर, १९४४, पृ. १५*
२६. *पेशवे दफ्तर भाग २१, पृ. १४*
२७. *सरकार जदुनाथ, पृ. २२८*
२८. *पेशवे दफ्तर भाग ०६, पृ. २०९*
२९. *पेशवे दफ्तर भाग २६, पृ. १७५, १७६*
३०. ***Nagrale N. N., Peshwa Maratha Relations and Malharrao Holkar, Publication Scheme, Jaipur,** 1989, पृ. ११३*
३१. *सरकार जदुनाथ, पृ. २६३ (बघा तळटिप)*
३२. *सरदेसाई गो.स., मराठी रियासत बाळाजी बाजीराव पेशवे, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९४४ पृ. २१५,२१६*
३३. *उपरोक्त, पृ. २१६*
३४. *साने का ना (संपा.) - पेशव्याची बखर, का ना साने, ५ वी आवृत्ती १९२९ पृ. १६*
३५. *गुजर यादव, पृ. ११३*
३६. *सरकार जदुनाथ, पृ. २२६ – २२७*
३७. *पेशवे दफ्तर भाग २१, पृ. १०*
३८. *पेशवे दफ्तर भाग १५, पृ. ९२*
३९. *सरदेसाई गो. स.,काळे या.मा. व वाकस्कर वि.स.(संपा.) - ऐतिहासिक पत्रे यादी वैगेरे, पृ. ३२७*